# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ४२–२०१०/ ४३–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) सौं. शालन हरिश्चंद्र पाटील,<br>मु. पो. वायफळे, ता. जत, जि. सांगली<br>२) श्री. दत्तात्रय रामचंद्र पाटील,<br>मु.पो. वायफळे, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

तक्रार क्र. ४२/२०१० व ४३/२०१० मधील अर्जदारांची नांवे व जोडणीची ठिकाणी भिन्न असली तरी तक्रार तपशील मजकूर सारखाच असल्याने निर्णय एकत्रित दिला आहे.

सौं. शालन हरिश्चंद्र पाटील, वायफळे, ता .जत, जि. सांगली यांनी गट क्र. २३२ मध्ये ५ एचपी शेतीपंप कनेक्शनसाठी व दत्तात्रय रामचंद्र पाटील यांनी मु.पो. वायफळे, गट क्र. २३७ मध्ये ५ एचपी शेतीपंप कनेक्शनसाठी दि. १९.३.२००८ रोजी रु. ५०००/– चलनाने भरले आहेत.

सदरचे कोटेशन मंजूर होत असतांना जादा रोहित्र धरलेले असतांनाही रोहित्र उभे न करता विनाकारण वेळ करुन परत वाहिनीचा विस्तार करुन वीज जोडणी दिली. रोहित्र मंजूर असल्याचे कथन वा तसे नोंद कंपनीने केलेली नाही त्यामुळे मजला नवीन रोहित्र बसवून त्यावरुन वीज पुरवठा केला जावा व रोहित्र उभे होईपर्यंत मजला विनियमातील तरतुदीप्रमाणे भरपाई मिळावी अशी तक्रार ग्राहकाने अंतर्गत कक्ष सांगली यांच्यासमोर दि. ३०.११.२००९ रोजी दाखल केली. कक्षाने मुदतीत निर्णय न दिल्याने दि. ११.२.२०१० रोजी सी.जी.आर.एफ. कोल्हापूर येथे अ फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली. वि.प.ने दि. १५.४.२०१० रोजी विलंबाने मुद्देनिहाय अभिप्राय पाठविला. त्यानंतर दि.२०.४.२०१० रोजी सुनावणीची तारीख निश्चित केली. सुनावणीच्यावेळी ग्राहकाचे प्रतिनिधी श्री. खापरे व वि.प.तर्फे प्रतिनिधी उपस्थित होते.

माहे ऑक्टोबर ते नोव्हेंबर या काळात मा. अध्यक्ष व ग्राहक सदस्य यांची पदें रिक्त असल्याने व तक्रार होण्याचे प्रमाण जास्त असल्याने सुनावणी नंतरही निर्णयास विलंब झाला आहे.

अंतर्गत कक्षाचा निर्णय, ग्राहकाची तक्रार, वि.प.चे म्हणणे, सुनावणी दरम्यानची कथने या सगळ्यांचा एकत्रित विचार करुन मंच खालील निष्कर्षाप्रत पोहोचला आहे.

सौं. शालन ह. पाटील व दत्तात्रय रामचंद्र पाटील या दोहोंच्यासाठी नवीन रोहित्र मंजूर होते ही बाब वि.प.ने आपल्या मुद्देनिहाय अभिप्रायात स्पष्ट केली आहे व तसे नमदू केले नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे. तथापि ग्राहकाने रु. ५०००/– १९.३.२००८ भरलेले आहेत. त्या संदर्भात मंचापुढे व लोकपालांच्यापुढे विलंबाबद्दलची तक्रार करुन रु. २००/– नुकसान भरपाई मिळाली आहे. ग्राहकाने १९.३.२००८ रोजी चलन भरल्यानंतर वाहिनीचा विस्तार गृहीत धरुन दि. १९.१२.२००८ रोजी लघुदाब वाहिनीवरुन कनेक्शन दिले असल्याचे वि.प.ने नमूद केले आहे. तसेच कमी दाब किंवा मोटर चालत नसल्याबद्दल कोणतीही लेखी वा तोंडी तक्रार ग्राहकाने केली नसल्याचे नमूद केले आहे. दि. १९.१२.२००८ रोजी वीज प्रवाह चालू केल्याने रोहित्राचा विषय आवश्यक असूनही करण्यास विलंब झाला ही बाब वि.प.ने नाकारलेली नाही. तथापि, रोहित्राचे काम ३ महिन्याचे कालावधीमध्ये पूर्ण करण्यात येईल असे आपल्या दि. १५.३.२०१० च्या मुद्देनिहाय अभिप्रायात स्पष्टपणे नमूद केले आहे. याचाच अर्थ दि. १४.७.२०१० पर्यंत नवीन रोहित्र उभे केले जाईल असे वि.प.ने नोंदविले आहे. सदर रोहित्रा बरोबरच ०.७२ कि.मी. उच्चदाब वाहिनी व ०.४८ लघुदाब वाहिनीचे कामही व्हावयाचे आहे. जरी वीज वितरण कंपनीने रोहित्राचा उल्लेख कोठेच केला नाही, या ग्राहकाच्या तक्रारीतील तथ्य समजण्यासारखे आहे तथापि वीज मागणी अर्जाचा मूळ गाभा वीज जोडणी विहीत मुदतीत देणे हा असल्याने चाचणी अहवाल दि. १३.८.२००८ रोजी दिला व विद्युत प्रवाह दि.१९.१२.२००८ रोजी दिला असल्याने झालेल्या विलंबाबद्दल मा. लोकपालांनी भरपाईचा आदेशही दिला आहे त्यामुळे रोहित्र उभे करुन लाईन देणे अथवा आहे त्या वाहिनीवरुन लाईन देणे या तांत्रिक बाबी असल्याने व त्याची पूर्ण जबाबदारी वि.प.ची असल्याने आवश्यक दाबाने वीज पुरवठा करणे हीही जबाबदारी वि.प.चीच आहे व त्या पध्दतीने सर्व तांत्रिक पाहणी करुनच चालू लघुदाब वाहिनीवरुन विद्यूत प्रवाह दिलेला दिसतो. तथापि, पुढील मागणीचा विचार करुन रोहित्र मंजूर केलेले दिसते. तरीही वि.प.ने तसा स्पष्ट खुलासा करुन रोहित्र उभे करण्याच्या आपल्या भूमिकेपासून पिछेहाट केलेली नाही. त्यामुळे ग्राहकाचा अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे. आदेश खालील प्रमाणे –

## आदेश

१) अर्जदाराच्या वीज मागणी अर्जाप्रमाणे वीज जोडणी विलंबाने दिली आहे व त्याबद्दल वि.प.स दंडही झाला असल्याने अर्जाचा मूळ हेतू वीज जोडणी देणे हा असल्याने अर्ज अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२) वि.प.ने मुद्देनिहाय अभिप्रायात नोंदविल्याप्रमाणे १४ जुलैं २००८ च्या आत रोहित्र उभे करुन देण्याची आवश्यकता आहे.

३) खर्चाबाबत आदेश नाही

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट् विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :